# रेशीम उद्योग: एक शेतीपूरक व्यवसाय

डिगांबर बोरकर गणेश हरणे वैभव सानप
पदवी विद्यार्थी,
कृषी महाविद्यालय, रिसोड

आजकाल शेती एक उद्योग म्हणून उदयास येत आहे. प्रत्यक्षात मातीत सोने पिकत आहे, मग ती भूखंडाच्या स्वरूपात असो किंवा शेताच्या स्वरूपात. शेतकरी आता फक्त सोयाबीन आणि गव्हाची लागवडीवर अवलंबून नाहीत. पशुपालन, मत्स्यपालन, दुग्ध प्रक्रिया प्रकल्प, दुग्ध उद्योगासह अनेक व्यवसाय आहेत, ज्यातून आज शेतकरी चांगले उत्पन्न घेत आहेत. शेतीतून मिळणारे उत्पन्न पाहता अनेक तरुण आपली नोकरी सोडून शेताकडे वळत आहेत. शेतीशी संबंधित असे एक काम आहे, जे चांगले पैसे मिळवून सुरू करता येते. शेतीशी संबंधित कामांपैकी एक म्हणजे रेशीम किड्यांचे संगोपन करणे. कच्चे रेशीम बनवण्यासाठी रेशीम किड्यांच्या संगोपनाला रेशीम उद्योग किंवा रेशीम शेती म्हणतात.

रेशीम शेती उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला व ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदतगार ठरणारा उद्योग आहे. महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती व हवामान रेशीम शेती उद्योगास पुरक असून वातावरणाच्या लहरीपणामुळे शेतीमध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी या उद्योगाची हमखास मदत होणार आहे. रोजगाराचा नवा मार्ग म्हणून रेशीम व्यवसायाकडे पाहता येऊ शकते. भारत सरकार रेशीम किड्यांच्या संगोपनासाठी प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य देण्याचे काम करते. या व्यतिरिक्त सरकार रेशीम कीटक संगोपन, रेशीम किड्यांची अंडी, कीटकांपासून तयार केलेल्या कोकोसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उपकरणे पुरवण्यास मदत करते.



रेशीम उत्पादनाच्या बाबतीत भारत चीननंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. सर्व प्रकारचे रेशीम येथे घेतले जातात. भारतात ६० लाखांहून अधिक लोक विविध प्रकारच्या रेशीम कीटकांच्या संगोपनाच्या व्यवसायात गुंतलेले आहेत. रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी रेशीम मंडळाची स्थापना १९४९ मध्ये झाली. मेघालयात सेंट्रल एरी रिसर्च इन्स्टिट्यूट आणि रांचीमध्ये सेंट्रल तुसार रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूटची स्थापना केली.

भारतात प्रामुख्याने तीन प्रकारची रेशीम शेती होते. तुती शेती, तुसार शेती आणि एरी शेती. रेशीम हे कीटकांच्या प्रथिनेपासून बनवलेले फायबर आहे. तुती अर्जुनाच्या पानांना खाणाऱ्या कीटकांच्या अळ्यापासून उत्तम रेशीम तयार केले जाते. तुतीची पाने खाऊन कीटकांनी निर्माण केलेल्या रेशीमाला तुती रेशीम म्हणतात. कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, जम्मू -काश्मीर आणि पश्चिम बंगाल येथे तुती रेशीम तयार होते. तुती नसलेले रेशीम झारखंड, छत्तीसगड, ओडिशा, उत्तर प्रदेश आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये तयार होते.

केंद्रासह प्रत्येक राज्य सरकार स्वत:च्या स्तरावर शेतकऱ्यांसाठी रेशीम योजना तयार करते. ज्या शेतकऱ्यांना त्यांच्या एक एकर जमिनीत तुती लागवड आणि रेशीम कीटक पालन करायचे आहे त्यांना सरकार सर्व प्रकारची मदत देत आहे. महाराष्ट्र राज्यात पुणे विभाग, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागात एकूण २४ जिल्ह्यात तुती रेशमाचे उत्पादन घेतले जाते. नागपूर विभागात नागपूर व वर्धा जिल्ह्यातील जमीन व वातावरण पोषक असल्याने तेथे प्रामुख्याने तुती लागवड केली जाते. आता रेशीम कोषाला कृषी पिकाचा दर्जा शासनाने प्रदान केला असून त्यामुळे रेशीम शेतीला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणे शक्य होणार आहे.

उच्च दर्जाच्या वस्त्रांमध्ये रेशीम वस्त्रांचा समावेश होतो. कथा पुराणांमध्येही रेशमी वस्त्रांचा उल्लेख आहे. भारतातील रेशीम उद्योगात महाराष्ट्राचे महत्त्वाचे स्थान आहे, त्यातही विदर्भाचा मोठा वाटा आहे. एवढेच नाही विदर्भातील 'टसर रेशीम' ने रेशीमच्या बाजारात स्थान निर्माण केले आहे. यात रेशीम संचालनालय नागपूरचा महत्त्वाचा वाटा आहे. रेशीमच्या बाजारात महाराष्ट्राच्या टसर रेशीम पैठणीला मोठी मागणी आहे. विदर्भातील भंडारा जिल्ह्यातील मोहाडी परिसरात टसर आणि तुतीच्या रेशीम कापड आणि धाग्याची निर्मिती होते. टसर रेशीम उद्योग प्रामुख्याने पूर्व विदर्भातील भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या चार जिल्ह्यात होतो. रेशीम शेती हा शेतीला पूरक जोडधंदा होऊ शकतो हे लक्षात आल्याने जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई आणि विदर्भ विकास महामंडळामार्फत 'रेशीम शेती उद्योग योजना' राबविली जात होती. यात विदर्भ विकास महामंडळ 'टसर रेशीम उद्योग योजना' राबवण्यात येते. रेशीम उद्योगामध्ये आर्थिक लाभ आणि रोजगार निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात वाव असून शेतक-यांना या उद्योगाकडे वाटचाल करण्याची गरज आहे.

★ ★ ★ (संपर्क: +९१ ८०१०३६८२२४)